Vagdhara: A Multilingual Peer Reviewed Research Journal (ISSN 2839-6197)
Vol. 1 No. 3 (2026): April-June; Website: https://vagdhara.in/index.php

प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात संताली भाषेचे महत्व : एक चिकित्सक अभ्यास

***रणवीर सुमेध भगवान**

*सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, भाषा भवन, विश्वभारती विद्यापीठ, शांतिनिकेतन, पश्चिम बंगाल

Received: September 13, 2026 *Accepted: November 12, 2026*

शोध सार

भारत हा बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक देश असून येथे विविध आदिवासी समुदायांच्या भाषा, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती अस्तित्वात आहेत। या विविधतेमध्ये संथाल समाजाचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे। संथाल समाजाची संताली भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून त्या समाजाची सांस्कृतिक अस्मिता, ऐतिहासिक परंपरा आणि सामूहिक जीवनानुभव व्यक्त करणारे महत्त्वपूर्ण साधन आहे। शिक्षणाच्या प्रक्रियेत मातृभाषेचे स्थान अनन्यसाधारण असून विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तीचा, बौद्धिक क्षमतेचा आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास मातृभाषेच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे होऊ शकतो। तथापि, भारतातील आदिवासी विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण घेण्याच्या प्रक्रियेत अनेक भाषिक, सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागतो। संताली भाषेच्या संदर्भात लिपीचा प्रश्न, पाठ्यपुस्तकांची उपलब्धता, प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव, रोजगाराच्या संधी आणि विविध राज्यांची भाषाविषयक धोरणे हे प्रश्न विशेष महत्त्वाचे आहेत। प्रस्तुत संशोधनपर लेखात संताली भाषेचा ऐतिहासिक विकास, ओल चिकी लिपीची निर्मिती, भारतीय राज्यघटनेतील भाषिक व शैक्षणिक तरतुदी, आदिवासी शिक्षणातील मातृभाषेचे महत्त्व, संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षणाचे फायदे आणि त्यासमोरील आव्हाने यांचा चिकित्सक दृष्टिकोनातून विचार करण्यात आला आहे। आदिवासी समाजाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासासाठी मातृभाषाधारित शिक्षणव्यवस्था विकसित करण्याची आवश्यकता हा या अभ्यासाचा प्रमुख निष्कर्ष आहे।

बीज शब्द : आदिवासी शिक्षण, संथाल समाज, संताली भाषा, मातृभाषा, ओल चिकी लिपी, भाषिक अस्मिता, सांस्कृतिक संवर्धन।

शिक्षण ही मानवी जीवनाला प्रगल्भता, विवेकशीलता आणि प्रबोधन प्राप्त करून देणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे। शिक्षणाशिवाय मानवाला विकसित आणि प्रगत जीवन जगणे शक्य नाही। मानव आणि इतर प्राण्यांमधील मूलभूत फरक म्हणजे मानवाची विकसित झालेली बौद्धिक क्षमता होय। शिक्षणाच्या माध्यमातून या बौद्धिक क्षमतेचा विकास होतो आणि मानवी मन अधिक प्रगल्भ व प्रबुद्ध बनते। शिक्षण हे केवळ माहिती किंवा ज्ञान संपादन करण्याचे साधन नसून व्यक्तीच्या विचारप्रक्रियेला दिशा देणारे, सामाजिक जाणीव विकसित करणारे आणि परिवर्तनाची प्रेरणा देणारे प्रभावी माध्यम आहे। महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून स्त्रिया, शूद्र आणि अतिशूद्र यांच्या शैक्षणिक विकासासाठी ऐतिहासिक कार्य केले। त्यांनी मुलींसाठी तसेच सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी शाळा सुरू करून भारतीय शिक्षणव्यवस्थेत परिवर्तनाची प्रक्रिया सुरू केली। शिक्षणाच्या अभावामुळे समाजाची होणारी अधोगती स्पष्ट करताना महात्मा फुले यांनी पुढील विचार मांडले आहेत।

"विद्येविना मती गेली । मतीविना नीती गेली । नीतीविना गती गेली । गतीविना वित्त गेले । वित्ताविना शूद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने केले II"[1] महात्मा फुले यांच्या या विचारांतून शिक्षणाचे सामाजिक, नैतिक आणि आर्थिक महत्त्व स्पष्ट होते। अज्ञान हे व्यक्तीच्या आणि समाजाच्या प्रगतीतील प्रमुख अडथळा असल्याचे त्यांच्या विचारांतून अधोरेखित होते। विशेषतः शतकानुशतके सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विषमतेचा सामना करणाऱ्या वंचित समाजघटकांच्या विकासासाठी शिक्षण अत्यावश्यक आहे। भारतीय राज्यघटनेच्या कलम २१-अ अंतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आला आहे। तसेच भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ३५०-अ (Article 350A) हे प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्या संदर्भात आहे। "भाषिक अल्पसंख्याक गटांतील मुलांसाठी प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर मातृभाषेतून शिक्षण घेण्याची पुरेशी सोय उपलब्ध करून देणे, हे प्रत्येक राज्याचे आणि राज्यातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचे

कर्तव्य असेल"[2] हि तरतूद भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५०-अ मध्ये तरतूद करण्यात आली आहे। शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ मध्येही शक्य असेल तेथे बालकाच्या मातृभाषेतून शिक्षण देण्याच्या महत्त्वाचा विचार करण्यात आला आहे। या घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींच्या पार्श्वभूमीवर भारतातील आदिवासी समाजाच्या मातृभाषेतील शिक्षणाचा प्रश्न अधिक महत्त्वपूर्ण ठरतो।

भारतामध्ये अनेक आदिवासी समुदाय स्वतःची स्वतंत्र भाषा, बोली, संस्कृती आणि परंपरा जतन करून आहेत। या समुदायांच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांच्या भाषिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा विचार करणे आवश्यक आहे। प्रस्तुत लेखामध्ये संथाल समाजाच्या संदर्भात संताली भाषेचे शैक्षणिक महत्त्व आणि मातृभाषाधारित शिक्षणाची आवश्यकता यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे। भारतातील सर्वांत मोठ्या आदिवासी समुदायांपैकी संथाल हा एक महत्त्वपूर्ण समुदाय आहे। झारखंड, पश्चिम बंगाल, ओडिशा, आसाम, त्रिपुरा आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये संथाल समाजाची लोकसंख्या प्रामुख्याने आढळते। याशिवाय नेपाळ, बांगलादेश, भूतान आणि म्यानमारच्या सीमावर्ती प्रदेशांतही संथाल समाजाचे वास्तव्य आहे। बांगलादेशातील संथाल समाजाने आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक अस्मितेच्या जतनासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे।

संताली भाषा ऑस्ट्रो-एशियाटिक भाषा परिवारातील मुंडा भाषासमूहाची एक महत्त्वपूर्ण भाषा आहे। या भाषेला स्वतंत्र लिपी प्राप्त होण्यापूर्वी तिचे लेखन विविध लिप्यांच्या माध्यमातून केले जात असे। रोमन, देवनागरी आणि बंगाली लिपींचा संताली भाषेच्या लेखनासाठी वेगवेगळ्या प्रदेशांत वापर करण्यात आला। मात्र, संताली भाषेची स्वतंत्र ध्वनिव्यवस्था, भाषिक रचना आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती यांना अनुरूप अशा स्वतंत्र लिपीची आवश्यकता प्रकर्षाने जाणवू लागली। या आवश्यकतेतून पंडित रघुनाथ मुर्मू यांनी १९२५ मध्ये 'ओल चिकी' या स्वतंत्र लिपीची निर्मिती केली। संताली भाषेच्या विकासासाठी आणि संथाल समाजाच्या सांस्कृतिक अस्मितेच्या जतनासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले। त्यामुळे संथाल समाजात त्यांना 'गुरू गोमके' या सन्मानार्थ नावाने ओळखले जाते। त्यांनी ओल चिकी लिपीच्या माध्यमातून संताली भाषेत व्याकरण, नाटक, कविता, कथा आणि विविध साहित्यप्रकारांतील १५० हून अधिक ग्रंथांची निर्मिती केली। त्यांच्या साहित्यनिर्मितीमागे संथाल समाजामध्ये भाषिक जागृती निर्माण करणे आणि शैक्षणिक-सांस्कृतिक विकासाला चालना देणे हा व्यापक उद्देश होता।

ओल चिकी ही वर्णमालात्मक लिपी असून तिची रचना इतर भारतीय लिप्यांपेक्षा स्वतंत्र स्वरूपाची आहे। संताली भाषेच्या ध्वनींचे आणि भाषिक वैशिष्ट्यांचे प्रतिनिधित्व करण्याच्या दृष्टीने या लिपीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे। ओल चिकीच्या निर्मितीमुळे संताली भाषेला स्वतंत्र लेखन परंपरा विकसित करण्याची संधी उपलब्ध झाली। त्यामुळे संताली साहित्यनिर्मिती, मुद्रण, प्रकाशन आणि शिक्षणाच्या क्षेत्रात या लिपीचा वापर वाढू लागला। पश्चिम बंगाल सरकारने १९७९ मध्ये संताली भाषेला राज्यातील मान्यताप्राप्त भाषेचा दर्जा दिला। त्यानंतर संथाल समाजाच्या दीर्घकालीन भाषिक संघर्षाला महत्त्वपूर्ण यश मिळाले। 'भारतीय राज्यघटनेच्या ९२ व्या घटनादुरुस्ती अधिनियमाद्वारे संताली भाषेचा आठव्या अनुसूचीत समावेश करण्यात आला"[3] या घटनादुरुस्तीमुळे संताली भाषेला राष्ट्रीय स्तरावर घटनात्मक मान्यता प्राप्त झाली। संताली भाषेच्या विकासाच्या इतिहासात ही घटना अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते। ओल चिकी लिपीच्या निर्मितीपासून संताली भाषेला घटनात्मक मान्यता मिळेपर्यंतचा प्रवास हा केवळ भाषिक विकासाचा इतिहास नाही, तर संथाल समाजाच्या अस्मितेचा, स्वाभिमानाचा आणि सांस्कृतिक अस्तित्वाच्या संघर्षाचाही इतिहास आहे। शिक्षण ही व्यक्तीच्या आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाची मूलभूत अट आहे। शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तीला ज्ञान, विवेक, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास प्राप्त होतो। आधुनिक समाजव्यवस्थेत सामाजिक आणि आर्थिक प्रगती साधण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे। तथापि, भारतीय आदिवासी समाजाच्या संदर्भात शिक्षणाचा प्रश्न केवळ साक्षरतेपुरता मर्यादित नसून तो सामाजिक न्याय, सांस्कृतिक अस्मिता, भाषिक अधिकार आणि समान संधी यांच्याशी संबंधित आहे।

आदिवासी समाजाची जीवनपद्धती, सामाजिक रचना, सांस्कृतिक परंपरा आणि निसर्गाशी असलेले नाते इतर समाजघटकांपेक्षा वेगळे असते। आदिवासी विद्यार्थ्यांचे प्राथमिक ज्ञान त्यांच्या कुटुंबातील आणि समुदायातील सामाजिक-सांस्कृतिक अनुभवांतून विकसित झालेले असते। त्यामुळे शाळेत प्रवेश घेतल्यानंतर त्यांना पूर्णपणे अपरिचित भाषेतून शिक्षण दिल्यास त्यांच्या पूर्वज्ञानाचा आणि शालेय शिक्षणाचा अपेक्षित संबंध निर्माण होत नाही। परिणामी, विषयांचे आकलन करण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात। संथाल विद्यार्थ्यांच्या बाबतीतही ही समस्या प्रकर्षाने दिसून येते। त्यांच्या घरातील आणि सामाजिक व्यवहारातील भाषा संताली असताना शाळेत त्यांना बंगाली, हिंदी किंवा ओडिया यांसारख्या भाषांमधून शिक्षण घ्यावे लागते। अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना केवळ नवीन विषय शिकण्याचेच नव्हे, तर त्या विषयांसाठी वापरली जाणारी अपरिचित भाषा समजून घेण्याचेही आव्हान स्वीकारावे लागते। यामुळे त्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असते।

संथाल विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आत्मीयता, आत्मविश्वास आणि परिचयाची भावना निर्माण करण्यासाठी प्राथमिक स्तरावर मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण देणे आवश्यक आहे। मातृभाषेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्वज्ञानाचा उपयोग करून नवीन ज्ञान आत्मसात

करता येते। त्यामुळे शिक्षणाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि अर्थपूर्ण बनते। आदिवासी समाजाच्या विकासासाठी शिक्षणव्यवस्थेने त्यांच्या भाषिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा आदर करणे आवश्यक आहे। शिक्षणाच्या प्रक्रियेत मातृभाषेचे स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे। बालक आपल्या कुटुंबात आणि समाजात सर्वप्रथम मातृभाषेच्या माध्यमातूनच जगाचे ज्ञान प्राप्त करते। त्याच्या भावना, विचार, अनुभव आणि प्राथमिक संकल्पना मातृभाषेतून विकसित होत असतात। त्यामुळे शाळेतील शिक्षणही मातृभाषेच्या माध्यमातून दिल्यास बालकाला नवीन ज्ञान आत्मसात करणे अधिक सुलभ होते। मातृभाषेमुळे अध्यापन-अध्ययन प्रक्रिया स्पष्ट, सहज, परिणामकारक आणि आनंददायी बनते।

मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण घेतल्यास विद्यार्थ्यांची आकलनक्षमता आणि ग्रहणशक्ती विकसित होण्यास मदत होते। विद्यार्थ्यांना संकल्पना समजून घेण्यासाठी अपरिचित भाषेचा अतिरिक्त अडथळा पार करावा लागत नाही। त्यामुळे त्यांचे लक्ष विषयाच्या आशयाकडे अधिक केंद्रित होते। संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षण दिल्यास संथाल विद्यार्थ्यांना विज्ञान, गणित, इतिहास, भूगोल आणि इतर विषयांचे ज्ञान त्यांच्या परिचित भाषेतून प्राप्त होऊ शकते। मातृभाषेतून शिक्षण दिल्याने विद्यार्थ्यांना इतर भाषा शिकण्यास अडथळा निर्माण होतो, अशी धारणा योग्य नाही। उलट, मातृभाषेतील भाषिक आणि संकल्पनात्मक पाया भक्कम झाल्यास विद्यार्थ्यांना इतर भाषा शिकणे अधिक सुलभ होऊ शकते। या संदर्भात भाषा संशोधक प्रोफेसर गणेश देवी आपल्या इंडियन एक्सप्रेसला दिलेल्या मुलाखतीत म्हणतात "Pedagogically and from a linguistic perspective, it is not desirable to formally introduce a third language in school at such a young age। It is also inappropriate from the standpoint of child psychology"[4] त्यामुळे संताली भाषेतील प्राथमिक शिक्षणाबरोबरच हिंदी, बंगाली, ओडिया आणि इंग्रजी यांसारख्या भाषांचे टप्प्याटप्प्याने शिक्षण देण्याची व्यवस्था विकसित करणे आवश्यक आहे। अशा बहुभाषिक शिक्षणपद्धतीमुळे विद्यार्थ्यांना मातृभाषेचे ज्ञान आणि व्यापक सामाजिक व्यवहारासाठी आवश्यक असलेली भाषिक क्षमता दोन्ही प्राप्त होऊ शकतात। भारतीय राज्यघटनेमध्ये शिक्षणाचा अधिकार, भाषिक अल्पसंख्याकांचे अधिकार आणि भाषिक विविधतेच्या संरक्षणासंदर्भात महत्त्वपूर्ण तरतुदी करण्यात आल्या आहेत। या तरतुदींच्या पार्श्वभूमीवर संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रश्न समजून घेणे आवश्यक आहे। भारतीय राज्यघटनेच्या कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्राप्त आहे। या तरतुदीमुळे शिक्षण हा केवळ शासकीय धोरणाचा विषय न राहता नागरिकांचा मूलभूत अधिकार बनला आहे। तथापि, या कलमामध्ये मातृभाषा हे शिक्षणाचे अनिवार्य माध्यम म्हणून स्पष्टपणे नमूद केलेले नाही। त्यामुळे मातृभाषेतील शिक्षणाचा विचार इतर घटनात्मक आणि कायदेशीर तरतुदींच्या संदर्भात करणे आवश्यक आहे।

शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ हा १ एप्रिल २०१० पासून अंमलात आला। "या अधिनियमानुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण मिळण्याची तरतूद आहे। या अधिनियमाच्या कलम २९(२)(फ) मध्ये शक्य असेल तेथे बालकाच्या मातृभाषेतून शिक्षणाचे माध्यम असावे, असा विचार मांडण्यात आला आहे"[5] त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या मातृभाषेतील शिक्षणाच्या दृष्टीने या तरतुदीला विशेष महत्त्व प्राप्त होते। भारतीय राज्यघटनेच्या कलम ३५०-अ नुसार भाषिक अल्पसंख्याक गटांतील मुलांना प्राथमिक स्तरावर मातृभाषेतून शिक्षण देण्यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न राज्यांनी करणे अपेक्षित आहे। या तरतुदीचा उद्देश भाषिक अल्पसंख्याकांच्या शैक्षणिक हितांचे संरक्षण करणे हा आहे। आदिवासी भाषांच्या संदर्भातही मातृभाषेतील प्राथमिक शिक्षणाच्या संधी विकसित करण्यासाठी या तरतुदीचा विचार महत्त्वपूर्ण ठरतो।

भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीत संताली भाषेचा समावेश करण्यात आला आहे। ९२ व्या घटनादुरुस्ती अधिनियम, २००३ द्वारे संतालीसह बोडो, डोगरी आणि मैथिली या भाषांना आठव्या अनुसूचीत स्थान देण्यात आले। या घटनात्मक मान्यतेमुळे संताली भाषेच्या राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेत वाढ झाली। भाषेच्या संवर्धनासाठी, साहित्यनिर्मितीसाठी आणि शैक्षणिक विकासासाठी या मान्यतेला विशेष महत्त्व आहे। पश्चिम बंगाल सरकारने १९७९ मध्ये संताली भाषेला राज्यात मान्यता दिली। पुढे २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील निवडक जिल्ह्यांमधील काही प्राथमिक शाळांमध्ये इयत्ता पहिलीपासून संताली भाषेतून औपचारिक शिक्षण सुरू करण्याची घोषणा करण्यात आली। या निर्णयामुळे संताली भाषेच्या शैक्षणिक वापराला प्रोत्साहन मिळाले। तथापि, अशा उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक, प्रमाणित पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य आणि सातत्यपूर्ण प्रशासकीय पाठबळ आवश्यक आहे।

संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षण देणे हे संथाल समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि भाषिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे। मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना विषयांचे आकलन सहजपणे होते। त्यांच्या विचारशक्तीला आणि सर्जनशीलतेला चालना मिळते। विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेचा विकास होण्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडणही अधिक प्रभावीपणे होते।

संताली भाषेतील शिक्षणामुळे या भाषेचे संवर्धन आणि संरक्षण होण्यास मदत होते। शैक्षणिक व्यवहारात भाषेचा वापर वाढल्यामुळे तिचे अस्तित्व दीर्घकाळ टिकून राहू शकते आणि पुढील पिढ्यांपर्यंत तिचे हस्तांतरण सहजपणे होऊ शकते। मातृभाषेच्या माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या मुलांची शैक्षणिक प्रगती अधिक प्रभावी होण्यास मदत होते। मातृभाषेतून शिक्षण घेतल्यामुळे विद्यार्थ्यांची आकलनक्षमता, ग्रहणशक्ती आणि विचार करण्याची क्षमता विकसित होते। तसेच मातृभाषेतील भक्कम पायामुळे विद्यार्थ्यांना इंग्रजी, फ्रेंच आणि इतर परकीय भाषा शिकणेही अधिक सुलभ होऊ शकते। मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना केवळ स्वतःच्या भाषेत बोलणे, वाचणे आणि लिहिणे एवढेच कौशल्य प्राप्त होत नाही, तर इतर भाषांमधील भाषिक कौशल्ये विकसित करण्यासाठीही आवश्यक असलेला आत्मविश्वास प्राप्त होतो।

संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षण दिल्यास संथाल समाजाच्या पारंपरिक ज्ञानाचे, सांस्कृतिक मूल्यांचे, रूढी-परंपरांचे आणि जीवनपद्धतीचे जतन करता येते। संथाल समाजाकडे निसर्ग, पर्यावरण, शेती, औषधी वनस्पती आणि सामुदायिक जीवनासंदर्भात पिढ्यान्पिढ्या संचित झालेले समृद्ध पारंपरिक ज्ञान आहे। हे ज्ञान एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होण्यासाठी मातृभाषेचे माध्यम अत्यंत प्रभावी ठरते। विशेषतः वडीलधाऱ्या पिढीकडून तरुण पिढीकडे जाणारे अनुभव, लोकपरंपरा, मौखिक इतिहास आणि सांस्कृतिक मूल्ये संताली भाषेतून अधिक सहजपणे पोहोचविता येतात। संताली भाषेच्या वापरामुळे संथाल विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाविषयी आपलेपणा, आत्मीयता आणि आत्मविश्वासाची भावना निर्माण होते। त्यांच्या घरातील आणि सामाजिक जीवनातील भाषा शाळेच्या शिक्षणात वापरली गेल्यास शाळा आणि घर यांच्यातील भाषिक अंतर कमी होते। परिणामी, विद्यार्थ्यांना अध्यापन-अध्ययन प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होता येते। विषयांचे आकलन अधिक स्पष्टपणे होते आणि शिक्षणाची प्रक्रिया आनंददायी व परिणामकारक बनते। मातृभाषेतून शिक्षण मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारा न्यूनगंड कमी होण्यासही मदत होते।

संताली भाषेच्या शिक्षणासमोरील आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे लिपीसंदर्भातील मतभेद। संथाल समाजामध्ये संताली भाषेच्या लेखनासाठी कोणती लिपी अधिकृत किंवा प्रमाणित मानावी, याबाबत वेगवेगळी मते आढळतात। ओल चिकी, रोमन, देवनागरी आणि बंगाली लिपींच्या वापरासंदर्भातील मतभिन्नतेमुळे शिक्षणव्यवस्थेत एकसमान धोरण राबविणे कठीण होते। पंडित रघुनाथ मुर्मू यांनी निर्माण केलेली ओल चिकी ही संताली भाषेची स्वतंत्र लिपी असली, तरी तिच्या शैक्षणिक वापराचा विस्तार करण्यासाठी सर्व स्तरांवर एकमत, संस्थात्मक पाठबळ आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा निर्माण करणे महत्त्वाचे आहे। संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षण घेतल्यास आदिवासी विद्यार्थ्यांच्या भविष्यातील रोजगाराच्या संधींवर काय परिणाम होईल, असाही प्रश्न संथाल समाजातील अनेकांच्या मनात निर्माण होतो। उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, सरकारी नोकऱ्या आणि इतर व्यावसायिक क्षेत्रांमध्ये संताली भाषेतून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध होतील का, ही एक महत्त्वाची चिंता आहे। त्यामुळे मातृभाषेतील प्राथमिक शिक्षणाबरोबरच पुढील शैक्षणिक स्तरांवर इतर भाषांचे आणि आधुनिक ज्ञानशाखांचे शिक्षण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे। मातृभाषेतील शिक्षण आणि व्यापक रोजगाराच्या संधी यांच्यामध्ये समन्वय साधणे ही काळाची गरज आहे।

संथाल समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकासासाठी शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची गुरुकिल्ली आहे। मात्र, हे शिक्षण संथाल समाजाच्या मातृभाषेतून, म्हणजेच संताली भाषेतून दिले गेले तर त्याचे परिणाम अधिक प्रभावी ठरू शकतात। मातृभाषेच्या माध्यमातून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, आकलनक्षमता, सर्जनशीलता आणि सांस्कृतिक जाणीव निर्माण करते। त्यामुळे संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षण देणे ही केवळ शैक्षणिक गरज नसून संथाल समाजाच्या भाषिक आणि सांस्कृतिक अस्तित्वाच्या संरक्षणाचीही आवश्यकता आहे। आदिवासी समाजाच्या विकासासंदर्भात स्वर्गीय प्रा। रामदयाल मुंडा यांनी सरकारी विकासधोरणांवर भाष्य करताना पुढील विधान केले आहे। मूळ लेखात दिलेले त्यांचे हिंदीतील उद्धरण पुढीलप्रमाणे आहे। "पचास के दशक से आज ताक देश में जितनी भी योजनाएं कार्यान्वित हुयी उनका सबसे अधिक बोझ आदिवासी क्षेत्रोंपर पड़ा। यह काम इतने अमानवीय तरीके से हुआ कि देश की पूरी आदिवासी आबादी के एक चौथाई से भी अधिक अपनी जड़ों से उखड दी गयी। जिसकी इस देश को कोई चिंता नहीं है। "[6] या विधानातून आदिवासी विकासाच्या नावाखाली राबविण्यात आलेल्या धोरणांमुळे आदिवासी समाजावर झालेल्या अन्यायाची आणि विस्थापनाची तीव्रता स्पष्ट होते। विकासाच्या प्रक्रियेत आदिवासी समाजाच्या भाषा, संस्कृती, परंपरा आणि अस्तित्वाचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे। केवळ भौतिक पायाभूत सुविधांची निर्मिती म्हणजे विकास नव्हे, तर समाजाच्या भाषिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकारांचे संरक्षण करणेही विकासाच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे।

त्याचप्रमाणे आदिवासी समाजातील बुद्धिजीवी, शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक आणि राजकीय नेतृत्वाने संताली भाषेच्या भवितव्याच्या दृष्टीने सक्रिय योगदान दिले पाहिजे। उच्च शिक्षण आणि रोजगाराच्या क्षेत्रात संताली भाषिक विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे। संताली भाषेतील शिक्षणाबरोबरच इतर भाषांचे ज्ञान आणि आधुनिक ज्ञानशाखांशी विद्यार्थ्यांचा परिचय करून दिल्यास

त्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल। अशा प्रकारे संताली भाषेला शिक्षणाच्या क्षेत्रात योग्य स्थान मिळाल्यास संथाल समाजाच्या भाषिक अस्मितेचे संरक्षण होईल, सांस्कृतिक वारशाचे संवर्धन होईल आणि भावी पिढ्यांना स्वतःच्या भाषेतून ज्ञानप्राप्तीची संधी उपलब्ध होईल। संताली भाषा केवळ संवादाचे माध्यम न राहता सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक प्रगती आणि सांस्कृतिक स्वाभिमानाचे प्रभावी साधन ठरू शकते। म्हणूनच आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संताली भाषेच्या माध्यमातून शिक्षणाचा प्रसार करणे ही काळाची गरज आहे।

संदर्भ

1. फुले जोतीराव, तृतीय रत्न, महात्मा फुले समग्र वाङ्मय, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई,संपा. धनंजय किर,सगं. मालशे आणि य. दि.फडके, सहावी आवृत्ती- नोव्हेंबर २००६, पृष्ठ २६३
2. https://indiacodel ecourtsindial com/constitution-of-india/article/350A/
3. https://enl wikipedial org/wiki/Eighth_Schedule_to_the_Constitution_of_India
4. https://master-dsel-educationl digifootprintl govl in/documents/acts-and-policies/right-to-education-AjM5ATMtQWa?pageTitle=Right-to-Education-Act,-20093
5. Devy, Gl Nl (2025, August 6). Interview in "Covert imposition of Hindi as default third language undermines।।। ". The Indian Express
6. मुंडा रामदयाल, आदिवासी समाज और विकास की राजनीती, साक्षात्कार, जनसत्ता, ५ अक्टूबर २०२२, इंडियन एक्सप्रेस ग्रुप.

■■■